# लिलावती रुग्णालयाला 'जेसीआय गोल्ड सील' मान्यता

## रुग्ण सुरक्षा व वैद्यकीय सेवांच्या उत्कृष्टतेची जागतिक पातळीवर दखल

**मुंबई, दि. ०५ (प्रतिनिधी) :** मुंबईतील लिलावती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर (एलएचआरसी)ला प्रतिष्ठित जॉइंट कमिशन इंटरनॅशनल (जेसीआय) संस्थेकडून 'गोल्ड सील ऑफ अप्रूव्हल' ही मान्यता प्राप्त झाली आहे. रुग्ण सुरक्षा, उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा आणि संस्थात्मक व्यवस्थापनातील उत्कृष्टतेसाठी दिली जाणारी ही मान्यता जागतिक स्तरावर अत्यंत मानाची मानली जाते.

८ ते १२ डिसेंबर २०२५ या कालावधीत तीन आंतरराष्ट्रीय सर्वेक्षकांच्या पथकाने रुग्णालयाची सखोल तपासणी व मूल्यमापन केले. त्यानंतर लिलावती रुग्णालयाला ही मान्यता प्रदान करण्यात आली. या मान्यतेमुळे एलएचआरसी आता जगभरातील निवडक आणि उच्च दर्जाच्या आरोग्यसेवा देणाऱ्या रुग्णालयांच्या यादीत समाविष्ट झाले आहे.

ही मान्यता रुग्णकेंद्रित सेवा, वैद्यकीय क्षेत्रातील उत्कृष्टता, सातत्याने दर्जा सुधारण्याची बांधिलकी आणि कर्मचाऱ्यांचे सक्षमीकरण या बाबींप्रती रुग्णालयाच्या कटिबद्धतेची पुष्टी करते.

मूल्यमापन प्रक्रियेत रुग्णांना दिली जाणारी सेवा, शस्त्रक्रियेदरम्यान सुरक्षिततेचे निकष, औषधोपचार व्यवस्थापन, संसर्ग नियंत्रण, प्रशासनिक कार्यपद्धती, सुविधा व्यवस्थापन तसेच गुणवत्तेवर सातत्याने देखरेख या महत्त्वाच्या घटकांचा सखोल आढावा घेण्यात आला.

या मान्यतेमुळे रुग्णालयातील आरोग्यसेवेचा दर्जा अधिक उंचावण्यास मदत होईल, असा विश्वास रुग्णालय प्रशासनाने व्यक्त केला आहे.